२) शासन निर्णय क्र. पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५एप्रिल, २००२ नुसार संस्थेने प्रत्यक्षात प्रवेश देण्यापूर्वी रु.१,००,०००/- (रुपये एक लांख फक्त) एवढी अनामत रक्कम संचालकाच्या पी.एल.ए. खात्यात जमा करण्यांत यावी.

३) डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या सूचनेप्रमाणे संलग्नता प्राप्त नसतांना विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. असे प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार नाही. याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

४) या व्यतिरिक्त नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

५) डि.जी.ई. टी., नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

६) त्याचप्रमाणे डि.जी.ई.टी., नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

**ब) <u>सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमधून नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु / व्यवसाय बदल इ. सुरु करण्याबाबत.</u>**

१) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने आवश्यक त्या बार्बीचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार १०० टक्के पूर्तता करुन स्थायी समितीतर्फे आगामी होणारे निरीक्षण करुन घेऊन सदर मंजूर नवीन व्यवसाय/जादा तुकडीस डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल.

२) सदर नवीन व्यवसाय जादा तुकड्यांना डि.जी.ई.टी., नवी दिल्ली यांची संलग्नता घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत अन्यथा प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार नाही व परीक्षा घेण्यांची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

३) शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२,दि. १५ एप्रिल,२००२ नुसार संस्थेने प्रत्यक्षात प्रवेश देण्यापूर्वी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) प्रति व्यवसाय, प्रति तुकडी एंवढी अनामत रक्कम संचालकांच्या पी.एल.ए. खात्यात जमा करण्यांत यावी.

४) या व्यतिरिक्त शासनाकडून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयांचे / आदेशांचे काटेकारपणे पालन करण्यांत यावेत.

५) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व राज्य शासनाने/संचालकांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांने/निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबतीत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेल्या नवीन व्यवसायांची /जादा तुकड्यांची परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

...३/-